## प्रकरण पहिले

# आंबेडकरपूर्व दलित चळवळ

# प्रकरण पहिले

# आंबेडकरपूर्व दलित चळवळ

## प्रस्तावना

आंबेडकरपूर्वकालात काही विचारवंतानी अस्पृश्यांमध्ये सुधारणा घडवून आणण्याच्यादृष्टीने आपले विचार मांडले तर काहींनी आपल्या विचारांना कृतीची जोड देऊन अस्पृश्यांमध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. हिंदूधर्म हा चातुवर्ण्य व्यवस्थेवर उभा असून, चातुर्वर्ण्यव्यवस्थेचे चित्र आपणास ''मनुस्मृती'' या ग्रंथात आढळते. ''मनुस्मृती'' हा हिंदूधर्मियांचा पवित्र ग्रंथ मानला जात असे. 'मनुस्मृतीच्या' पहिल्या अध्यायातील ३१ व्या श्लोकात शूद्रांची उत्पत्ती कशी झाली याचा उल्लेख आढळतो. चातुर्वर्ण्याची उत्पत्ती ऋग्वेदातील पुरुष सूक्तातही दिलेली आहे. मंडळ १० ऋचा ९० यात असे म्हटले आहे, ''ब्राम्हणांचा जन्म ब्रम्हदेवाच्या मुखापासून झाला म्हणून ते समाजात श्रेष्ठतम होत. क्षत्रियांचा जन्म खालच्या बाहुपासून झाला म्हणून ते ब्राम्हणाच्या खालच्या दर्जाचे होत, वैश्याचा जन्म ब्रम्हदेवाच्या मांडीपासून झाल्याने ते ब्राम्हण व क्षत्रिय यांच्यापेक्षा कमी दर्जाचे होत व शूद्राचा जन्म ब्रम्हदेवाच्या पायापासून झाल्याने ते सर्वापेक्षा निचतम दर्जाचे आहेत.''[१]

अशा प्रकारे शूद्रांना नीच ठरविणारे उल्लेख हिंदू धर्माच्या निरनिराळ्या ग्रंथात आढळतात. परंतु या ग्रंथाचा निश्चित कालखंड कोणता आहे या संदर्भात मात्र वादंग आहेत.

वेद, स्मृती, श्रुती, पुराणे आदी ग्रंथातून चातुवर्ण्याचा जन्म झाल्याचे मांडले जाते. एका जातीने दूसऱ्या जातीशी कसे वागावे याची नियमावली या धर्मग्रंथात आहे. उच्च जातीनी नीच जातीवर कोणती बंधने लादावीत, वरिष्ठ जातीनी कोणते हक्क, अधिकार उपभोगावेत, वापरावेत हे लिखित करून स्पष्ट केले आहे. यात कनिष्ठ जातीनी वरिष्ठ जातीची चाकरी सेवा कशी व कोणत्या पध्दतीने करावी अशा आशयाची बंधने सुस्पष्ट शब्दात नोंद केली आहेत. यात उच्च नीच जातीयतेची शिडी आहे. यात श्रेष्ठ कनिष्ठ जातीची उतरंड आहे.

यातून अस्पृश्यतेचा जन्म झाला, वाढ झाली. वरिष्ठ जाती स्पृश्य म्हणून मानल्या कनिष्ठ जाती अस्पृश्य म्हणून ठरविल्या गेल्या व त्याच्यांवर अस्पृश्यतेचा कायमस्वरूपी शिक्का मारला. अस्पृश्यांना अत्यंत वाईट वागणूक देण्यात येत असे.

''अस्पृश्य म्हणून त्यांना गावकुसाबाहेर, कायम दूर ठेवले. त्यांच्या वाटयाला हिन, ओंगळ, घाणेरडी हलक्या प्रतीची, कमी दर्जाची कामे दिली. तीच कामे त्यांनी सेवाभावीवृत्तीने केली पाहिजेत असा दंडक ठरविला. त्यांनी ही कामे करण्यात काही कसूर केली, उल्लंघन केले तर त्यासाठी कडक, कठोर, प्रसंगविशेषी जीवघेण्या शिक्षाही ठेवल्या.''[२]

''अस्पृश्यांना समाजापासून वेगळे ठेवण्यात आले होते. वरीष्ठ वर्गीयांचे साधेदेखील हक्क उपभोगण्याची त्यांना मनाई होती. अस्पृश्यांचा स्पर्श निषिध्द मानला जात होता. त्यामुळे शक्यतो अस्पृश्यांना दूर ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येत असे. त्यांचा स्पर्श झाल्यास तो विटाळ मानून त्याचे प्रायश्चित/शुध्दीकरण करण्यात येत असे.''[३] अस्पृश्यांना पशूपेक्षाही हीन मानल्यामुळे व धर्मग्रंथातून खालचा दर्जा दिल्यामुळे त्यांची परिस्थिती हलाखीची बनलेली होती. त्यांना समाजात इतर जाती व वर्गाप्रमाणे कोणतेही हक्क मिळाले नव्हते.

मध्ययुगीन महाराष्ट्रात अनेक संत निर्माण झाले. ज्ञानेश्वर, तुकाराम, चोखामेळा, नामदेव इत्यादी. त्यांनी आपआपल्यापरीने अस्पृश्यतेवर टिका केली. पण त्यामुळे फारसे काही बदल झाले नाहीत. "ज्ञानोबा ते तुकोबा या महाराष्ट्रातील वारकरी संतानी सामाजिक समतेची दिंडी पंढरपूरात वाळवंटापर्यंतच नेली. परंतु विठ्ठलाच्या मंदिरात ती प्रवेश करु शकली नाही. नामा शिंपी, सावता माळी, चोखा महार, नरहरी सोनार, गोरा कुंभार हे चंद्रभागेच्या वाळवंटात परस्परांना उराऊरी भेटत होते. परंतु पांडुरंगाच्या पायापर्यंत पोहचू शकत नव्हते. वाळवंटात त्यांची भजनात एकी होती. परंतु भोजनात मात्र बेकीच राहिली. 'समतेची दिंडी' वारकऱ्यांकडून 'धारकऱ्यांनी ' जेव्हा खांदयावर घेतली तेव्हा मात्र तिने पुढची मजल गाठली. भेट ती पांडुरंगाच्या चरणापर्यंत पोहचली. या समतेच्या धारकरी दिंडीचा पाया म. जोतीबा फुले यांनी घातला."[४]

वरील संतानी धार्मिक व आध्यात्मिक पातळीवरुन अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु त्यामुळे अस्पृश्यांची परिस्थिती सुधारु शकली नाही. पुढे पेशवाईच्या काळात तर अस्पृश्यता व चातुर्वर्ण्यव्यवस्थेने कळसच गाठला. मोठया प्रमाणात ती दृढ झाली. यामुळे अस्पृश्यांना रस्त्यावर फिरणेदेखील अशक्य झाले. इंग्रजांच्या आगमनानंतर त्यांनी आपल्या सत्तेचा पाया हळूहळू विस्तारीत व दृढ केला. १८३५ च्या लॉर्ड मेकॉले यांच्या प्रयत्नामुळे भारतात आधुनिक शिक्षणाला सुरुवात झाली. तेव्हापासून बहुजन समाजाला शिक्षणाची द्वारे इंग्रजामुळे खुली झाली. आजपर्यंत या देशातील कुठल्याही प्रांतातल्या बहुजन अस्पृश्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. पण तो ब्रिटीशांमुळे मिळाला. ब्राम्हण वर्गाची शिक्षणात मक्तेदारी होती. ब्राम्हणाशिवाय इतरांना शिक्षण मिळू नये अशा प्रकारचे नियम मनुस्मृतीने प्रतिपादले होते. पुढे "१८१३ च्या सनदी कायदयानुसार ईस्ट इंडिया कंपनीने भारतीयांच्या शिक्षणासाठी एक लाख रुपये खर्च करावेत असे बंधन घालण्यात आले."[५] इंग्रजांच्या शिक्षणविषयक धोरणामुळे व

ख्रिस्ती मिशनरी यांच्या प्रयत्नामुळे समाजात नवी जागृती आली. त्यांच्या प्रयत्नामुळेच भारतात सुशिक्षितांची पहिली पिढी निर्माण झाली. यामध्ये राजाराम मोहन रॉय, जांभेकर, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, रानडे, डॉ. भांडारकर, आगरकर इत्यादी प्रमुख व्यक्ती होत्या.

या पिढीने हिंदू धर्मातील दोषावर टिका करुन ते दूर करण्याचा प्रयत्न केला. व्याख्याने, नियतकालिके, निबंध, ग्रंथलेखन करुन जातीभेद नष्ट होण्यासाठी प्रयत्न केले. वेगवेगळया प्रकारच्या धार्मिक व सामाजिक बदलामध्ये सतीची चाल, विधवा विवाह, पुनर्विवाह, बालविवाह प्रतिबंधक कायदा, स्त्री शिक्षण इ. सुधारणांचा समावेश होता.

अस्पृश्यतेसारख्या काही परंपरा त्याज्य आहेत, कामाच्यादृष्टीने त्या कालबाहय झाल्या आहेत, म्हणून त्या टाकून द्याव्यात ही भूमिका नवशिक्षित विचारवंताकडून घेतली गेली. या चळवळीचे स्वरुप प्रामुख्याने सुधारणावादी असेच राहिले त्यातून परंपरावादी व नवविचारवादी असे दोन गट पडले. तरी संपूर्ण धर्मचौकटीस आव्हान दिल्याचे दिसत नाही. अनेकदा या नव्या धर्मसुधारणेस शास्त्राचा आधार शोधण्याचा केविलवाणा प्रयत्न काही मंडळींनी केला असल्याचे दिसते. त्यामुळे धर्म नाकारणे, देव ही संकल्पना नाकारणे या चळवळीने केले नाही.'' [६]

टिळक-आगारकर हा वाद गाजला पण तो जातीच्या परिघाबाहेर फारसा गेला नाही, तोत्या जातीपुरताच राहिला कारण केशवपन, विधवाविवाह हे प्रश्न केवळ ब्राम्हण जातीच्या स्त्रियांपुरतेच मर्यादित होते. ब्राम्हणेत्तरांमध्ये बहुसंख्याक समाजात केशवपनाची पध्दत नव्हती व विधवांचे पुनर्विवाह सर्रास होत होते. त्यामुळे सुधारणावादी मंडळीची चळवळ आपोआपच मर्यादित होत गेली. ज्यावेळी सामाजिक सुधारणावादी मंडळींची

टिळक अनुयायांनी कोंडी केली त्यावेळीही या मंडळीनी फुल्यांच्या चळवळीचा आधार घेतला नाही. किंबहुना फुल्यांच्या चळवळीशी नाते जोडणे त्यांना आवश्यक वाटले नाही''.[७]

अर्थात वरील सर्व समाजसुधारक हे उच्च वर्गातून पुढे आले होते. त्यांनी समाजसुधारणा करण्याचा प्रयत्न केला पण तो मर्यादित वर्गापुरताच.

## २. बहुजनांची अस्पृश्यांची चळवळ

महात्मा फुले आणि इतर बहुजन सुधारकांची चळवळ - याच कालावधीत व्यापक दृष्टीकोन ठेवून, बहुजन समाजाला व अस्पृश्यांना नव संजीवनी देण्याचे महत्वाचे कार्य महात्मा जोतिबा फुले यांनी केले. त्यांचा जन्म १८२७ मध्ये झाला. ब्राम्हण मित्राच्या लग्नाच्या वरातीत सहभागी झाल्याबददल त्यांचा जो अपमान झाला त्यामुळे ते दुःखी झाले. घडल्या प्रसंगाबददल त्यांनी चिंतन केले. त्यातून स्फुर्ती घेऊन स्त्रियां शूद्रातिशूद्र बहुजनांच्या गुलामगिरीविरुद्ध त्यांनी रणशिंग फुंकले आणि तेच भारतातील समग्र सामाजिक क्रांतीचे पहिले बंड ठरले. समग्र सामाजिक क्रांती यशस्वी करण्यासाठी स्त्रिया शूद्रातिशूद्र यांना विद्या दिली पाहिजे हा पक्का निर्धार मनाशी करुन त्यांनी पुण्यात १८४८ साली मुलींच्यासाठी एक शाळा सुरु केली. त्याचबरोबर त्यांनी अतिशूद्रांच्या शिक्षणाकडेही आपले लक्ष केंद्रित केले. इ.स.१८५२ मध्ये अस्पृश्यांसाठी वेताळपेठेत स्वखर्चाने एक शाळा सुरु केली. इ.स. १८५३ साली आपल्या काही होतकरू मित्रांच्या सहाय्याने ''महार मांग इत्यादी लोकास विद्या शिकविण्याकरिता मंडळी '' या नावाची संस्थ काढली. ''[८]

त्यांनी आपली पत्नी सावित्रीबाई फुले यांना प्रोत्साहन देऊन शिक्षिका बनविले. शेणमारा सहन करुन त्या माऊलीने आपल्या पतीच्या क्रांतीकार्यात मोलाची साथ दिली.

सनातन्यांनी बहिष्काराचे शस्त्र उपसले. मारेकारी घातले. तरी फुले पती-पत्नी आपल्या समाजपरिवर्तनाच्या कार्यापासून मागे हटले नाहीत.

बहुजन समाजाला संघटित करण्यासाठी व त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी २४ सप्टेंबर १८७३ रोजी ' सत्यशोधक समाजाची' स्थपना केली. फुले यांच्या प्रयत्नातून स्थापन झालेल्या या संस्थेंचे ध्येय पुढील प्रमाणे होते. ''शूद्र आणि अतिशूद्र यांची ब्राम्हण पुरोहिताकडून होणारी पिळवणूक बंद करणे, त्यांना त्यांच्या मानवी हक्कांची आणि अधिकारांची शिकवणे देणे आणि ब्राम्हणी शास्त्राच्या मानसिक आणि धार्मिक गुलामगिरीतून त्यांना मुक्त करणे हे ध्येय स्वीकारुनत्यांनी यासंस्थेची स्थापना केली होती.''[९]

सत्यशोधक समाजाची स्थापना म्हणजे समाज सुधारणा करण्यासाठी निर्माण केलेली ही पहिली बहुजनांची चळवळ होती. या संस्थेची प्रमुख तीन तत्वे होती. पहिले तत्व - सर्व माणसे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत व परमेश्वर त्यांचा आई-बाप आहे. दुसरे तत्व - आईला भेटण्यास अगर बापाला प्रसन्न करण्यास ज्याप्रमाणे मध्यस्थांची जरुरी नसते आणि तिसरे तत्व म्हणजे वरील तत्व कबूल असणाऱ्यांस या संस्थेचे सदस्य होता येईल.''[१०] सत्यशोधक समाजाच्या पहिल्या तत्वानुसार सर्व लोक समान आहेत व ते सर्व एकाच परमेश्वराची उत्पत्ती असल्याने ते एकमेकांचे बंधू आहेत असा व्यापक अर्थ स्पष्ट होतो.

धार्मिक कार्यात होणारी मध्यस्थी व त्यामुळे बहुजन समाजाची होणारी पिळवणूक यावर नियंत्रण घालण्यासाठी दुसरे तत्व निर्माण करण्यात आले होते. ही दोन्ही तत्वे मान्य असणाऱ्यांनाच या समाजाचे सदस्य होता येत असे.

सत्यशोधक समाजाने सर्वात मोठे कोणते कार्य केले असेल तर ते म्हणजे समाज जागृतीचे. सत्यशोधक जलसे व तमाशे याद्वारे जागृतीच्या कार्यात मोलाची भर घातली. हुंडा घेऊ नका-देऊ नका, कर्ज काढून सण-समारंभ साजरे करु नका, साध्या पध्दतीने लग्ने करावीत व जीवनाच्या सर्वच क्षेत्रात पुरोहित (ब्राम्हणांची) असलेली मक्तेदारी मोडून काढणे यासाठी सत्यशोधक समाजाने प्रयत्न केले.

उच्चवर्गीय समाजसुधारकांमध्ये आणि फुले यांच्या कार्यामध्ये मूलभूत असा फरक जाणवतो. उच्चवर्गीयांची चळवळ ही त्या समाजापुरती मर्यादित राहिली. पण महात्मा फुले यांचे विचार आणि चळवळ कुठल्या एका वर्गासाठी, जातीसाठी कधीच मर्यादित राहू शकली नाही. कारण 'माणूस' आणि माणसाचे मोठेपणे यासाठी फुलेंची चळवळ होती. त्या माणसाची जात महात्मा फुले यांच्यादृष्टीने महत्वाची नव्हती तर त्याचे 'माणूस' असणे महत्वाचे होते. महात्मा फुले यांनी सुरु केलेल्या स्त्रि शुद्रांच्या चळवळी मागे व्यापक असा अर्थ होता. ''स्त्री शूद्रांची चळवळही एक नवे आव्हान देते आहे हे येथील उच्च जातीच्या नेत्यांच्या लक्षात आले नसावे. त्यामुळे भारतीय प्रबोधन चळवळीला एक व्यापक स्वरुप येणार होते ते आले नाही. उलट जातींचा परिघ छेदून आधुनिक भारतात प्रथम जातीअंताची भूमिका मांडणारी महात्मा फुल्यांची चळवळ हीच खरी प्रबोधनाची चळवळ होती. ती केवळ शूद्रांची चळवळ म्हणून ब्राम्हणांनी आपली म्हणून स्वीकारली नाही. जातीपलिकडे मानवी प्रश्न म्हणून महात्मा फुल्यांनी ब्राम्हण स्त्रियांच्या केशवपनाविरूद्ध नाभिकांचा संप घडविला, विधवा विवाह घडवून आणले व ज्या ब्राम्हण विधवा स्त्रिया घरातीलच पुरुषांच्या वासनेच्या शिकार बनल्या त्यांच्यासाठी त्यांनी प्रसृतिगृह काढून माता म्हणून तिला पहिल्यांदा प्रतिष्ठा मिळवून दिली. कुमारीमाता व विधवामाता ही कल्पना आपल्याकडे नाही. कुठल्याही स्त्रीकडे ती माता आहे म्हणून पाहून तिला महत्व देण्याचा प्रयत्न महात्मा फुल्यांनी केला. धर्म हा

लबाडांचा आहे. सारे धर्मग्रंथ पुरुषांनी लिहिले आहेत. पुराणातील देवकथा या शेटजी-भटजीच्या व्यवस्थेला मजबूत करणाऱ्या आहेत. म्हणून शूद्रांनी त्या विरोधात उभे राहून सत्यधर्माने वर्तणूक करावी अशी भूमिका महात्मा फुल्यांनी घेतली.''[११]

सत्यशोधक समाजाच्या स्थापनेबरोबर समाजजागृतीसाठी '' गुलामगिरी'', ''ब्राम्हणांचे कसब'', शेतकऱ्यांचा आसूड' व ''सार्वजनिक सत्यधर्म'' इत्यादी ग्रंथांचे त्यांनी लेखन केले. महात्मा फुले यांनी शेतकरी, मजूर, शोषित, पिडित, स्त्री शुद्रातिशूद्र बहुजन समाज यांची मानसिक गुलामगिरीतून मुक्तता करण्याचा प्रयत्न केला. विविध क्षेत्रातील बहुजनांच्या कार्यासाठी महात्मा फुले शेवटपर्यंत झटले. प्रसंगी जीवे मारण्याच्या धमक्या आणि तसे प्रयत्नही झाले तरी ते डगमगले नाहीत. विविध क्षेत्रातील कार्यामुळेच ते भारतातील आदय समाजक्रांतीकार म्हणून ओळखले जातात. याशिवाय त्यांना हिंदूस्थानचा मार्टिन ल्यूथर किंग असेही म्हटले जाते. त्यांच्याबदद्ल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, '' हिंदू समाजातील बहुजन समाजात आत्मप्रत्यय व आत्मावलोकन उत्पन्न करणारा पहिला माणूस म्हणजे फुले होत.''[१२] महात्मा फुले यांच्यानंतर अस्पृश्य समाजाच्या उन्नतीसाठी कार्य करणारे अस्पृश्य समाजातीलच सुधारक म्हणजे गोपाळबाबा वलंगकर होत.

## ३. गोपाळ बाबा वलंगकर - अस्पृश्यांच्या चळवळीतील पहिले अस्पृश्य सुधारक

आंबेडकरपूर्व कालखंडात अस्पृश्यांच्यासाठी व बहुजन समाजासाठी कार्य करणारी अस्पृश्य समाजातील पहिली व्यक्ती म्हणजे गोपाळ बाबा वलंगकर होत. ते लष्करात नोकरीस होते. १८८६ मध्ये हवालदारपदावरुन ते निवृत्त झाले. त्याचे मूळ गाव कोकणातील महाडजवळचे रावढळ होय. अस्पृश्य समाजामध्ये जागृती कशी करता

येईल याचा ते सतत विचार करीत. २३ ऑक्टोबर १८८८ रोजी त्यांनी 'विटाळ विध्वंसन' नावाची पन्नास पानांची पुस्तिका लिहून पूर्ण केली. अल्पशिक्षित असले तरी गोपाळबाबांचे वाचन चौफेर होते. इतिहास, धर्म, समाज, संस्कृती या क्षेत्रातील त्यांचे चिंतन अमोघ होते. समाज स्थितीने निर्माण केलेल्या दृष्टचक्रकातून अस्पृश्यांना कसे मुक्त करता येईल हा ध्यास त्यांना सतत लागलेला होता. त्यासाठी अस्पृश्य हे मूळ क्षत्रिय होत, कालांतराने ते अस्पृश्य गणले गेले असा आपला सिध्दांत त्यांनी मांडला. या विचारातून अस्पृश्यांमध्ये एक स्वत्वशील जाणीव निर्माण करण्याचा गोपाळबाबांचा प्रयत्न निश्चित पहिला आणि महत्वपूर्ण होता असे म्हटले पाहिजे.''[१३]

गोपाळबाबांनी आणखी एक महत्वाची बाब केली ती म्हणजे त्यांनी अस्पृश्यांतील सर्व जातींना संघटित करुन सामुहिक रीतीने गुलामीचे जीवन कंठण्यास बध्द करणाऱ्या धर्मशास्त्रांचा, रुढींचा आणि परंपरांचा निषेध करण्यास त्यांना प्रवृत केले. एवढेच नाही तर त्याची कारणमिमांसाही केली.[१४]

अस्पृश्यावंर होणारा अन्याय जुलूम हा नैतिक नाही, तो अनैतिक आहे या संदर्भात पानतावणे म्हणतात की, '' महारांवर होणारा जुलूम म्हणून सृष्टी नियमांविरुद्ध, बुद्धीविरूद्ध, नीतीविरूद्ध व सदधर्माविरूध्द आहे. न्याय बुद्धीचा नाश म्हणजे पर्यायाने समाजाचा नाश असे त्यांचे सूत्र आहे. हे सूत्र घेऊनच त्यांनी विटाळ विध्वंसनमध्ये हिंदू धर्माची परखड समीक्षा केली आहे.''[१५]

अस्पृश्यांची सुधारणा करण्यासाठी १८९० साली गोपाळबाबांनी 'अनार्यदोष परिहारक मंडळाची' स्थापना केली. नीच मानिलेल्या वर्गाच्या दोषाचा परिहार होऊन त्यांची उन्नत्ती व्हावी आणि त्यास मनुष्यपणाचे हक्क मिळावे म्हणून गोपाळबाबांनी

आपल्या धर्म व देशबांधवाना विनंती करून दाद मागितली. परंतु आपल्याला काहीच प्रतिसाद मिळत नाही व पुढे मिळेल अशी आशाही नाही असे त्यांनी आपले मत व्यक्त केले.[१६]

गोपाळबाबा वलंगकर हे अस्पृश्यांतील पहिले समाजसुधारक आणि पहिले पत्रकार होते. गोपाळबाबा वलंगकर १९०० साली मृत्यू पावले. लष्करामध्ये अस्पृश्य सैन्याची भरती सरकारने बंद केली त्याविरुद्ध गोपाळबाबांनी १८९४ मध्ये ब्रिटीश सरकारला एक निवेदन देण्यासाठी तयारी केली होती. पण त्यावर पेन्शनरांनी सहया केल्या नाहीत. यासंदर्भात महर्षि विठ्ठल रामजी शिंदे म्हणतात -

'येथवर अस्पृश्यांसाठी स्पृश्यांनी ज्या चळवळी केल्या त्यांचाच उल्लेख आला आहे पण त्याबाबत स्वतः अस्पृश्यांनीसुद्धा आत्मोद्धाराची चळवळ केली आहे. पूर्वी ब्रिटीश सरकारच्या सैन्यात अस्पृश्य लोकांची भरती होत असे. ती पुढे बंद झाली. सुमारे १८९०-९१ पासून महार चांभारादि अस्पृश्यांची नवीन भरती बंद झाली. नंतर पूर्वीच्यानाही रजा मिळू लागली. हयाविषयी दाद लावून घेण्याचे पहिले प्रयत्न महाड तालुक्यातील रानडुल गावचे पेन्शन्र हवालदार गोपाळनाक विठ्ठलनाक वलंगकर नावाच्या वृध्द गृहस्थाने मोठया चिकाटीने केले. महात्मा फुले, बाबा पदम्नजी यासारख्यांची हयांना शिकवण व मदत होती. सन १८९५ साली पुण्यास भरलेल्या कॉंग्रेसच्या वेळी हयांनी चळवळ केली होती. दापोली येथील अस्पृश्य वर्गातील महार चांभार लष्करी पेन्शनरवाल्यांच्या वस्ाहतीतील सदर बाबाने बरीच चळवळ केली. पण चळवळ नवीन असल्याने यश आले नाही. त्यांनी हिंदुस्थान सरकारकडे अर्ज केला असता पेन्शनर लोकांना त्यावेळी सहया करण्याचेही धैर्य झाले नाही.''[१७]

## ४. अस्पृश्यांच्या चळवळीतील संपादक व संघटक, सुधारक किसन फागू बंदसोडे

नागपूर विदर्भातील किसन फागू बंदसोडे यांनी अस्पृश्यांच्या सुधारणाविषयक चळवळीस १९०० च्या सुमारास वाहून घेतले. १८ फेब्रुवारी १८७९ रोजी नागपूर जिल्हयातील मोहपा येथे त्यांचा जन्म झाला. अस्पृश्य समाजाला त्यांच्या स्थितीची जाणीव करून दयावी, त्यांच्यात विद्येचा प्रसार करावा, त्यांची आर्थिक, औद्योगिक व नैतिक उन्नत्ती व्हावी म्हणून किसन फागूंनी १९०३ साली ' सन्मार्गबोधक निराश्रित समाज' नावाची संस्था स्थापन केली. शाळेच्या बाहेरच बसून प्राथमिक शिक्षण घेतलेल्या किसन फागूंनी १९०७ साली मुलींसाठी वसतीगृहे चालविली. मिलकामगारांचे प्रश्न हाताळले. 'निराश्रित हिंद नागरिक' (१९१०), 'विटाळ विध्वसंक' (१९१३) आणि 'मजूरपत्रिका' (१९१८) ही पत्रे स्वतःच सुरु करुन दलित पत्रकारीतेच्या क्षेत्रात भरीव असे कार्य केले. सामाजिक प्रश्नांचा विचार करण्यासाठी परिषदा भरविल्या. ते परिषदा घेऊनच थांबले नाहीत तर घरोघर व गावोगाव फिरुन आपले जागृतीचे कार्य करीत राहिले. स्वतः एक लहानसा प्रेस खरेदी करुन आणि आपल्या पत्नीला खिळे जुळविण्याचे शिकवून त्यांनी पत्नीलाही समाजकार्यात समाविष्ट करून घेतले. या प्रेसमधून अस्पृश्यता विरोधी हँडबिल्स काढून ते गावोगाव वाटण्याचे अवघड काम त्यांनी केले. किसन फागूंतील संघटन कौशल्य आणि निर्भयता लोकांच्या मनावर परिणाम करीत होती. शिक्षण, समाज, धर्म याबाबतील व्याख्याने, प्रवचने, कवने व तमाशा या माध्यमातून त्यांनी अस्पृश्य मनात नवा विचार निर्माण केला. अनेक संघर्षांना तोंड देत ते वाटचाल करीत राहिले.'' [१८]

१९१२ पासून त्यांनी चोखामेळा जयंती उत्सव साजरा करण्यास प्रारंभ केला. त्यापूर्वीच किसन फागूंनी '' सन्मार्ग निराश्रित समाज' ही संघटना १ ऑक्टोबर १९०१ साली स्थापन करुन समाज संघटनेसाठी प्रयत्न आंरभिले होते. हे लक्षात घेण्यासारखे आहे. या समाजाला काही पुरोगामी उच्चवर्णियांनीही सहकार्य दिले होते. समाजसुधारणेची व्यापक दृष्टी असलेल्या या संस्थेने जनमानसावर फार मोठा प्रभाव टाकला. महार हे आदिवासी आहेत, ते खरे शेतमालक आहेत, आमचे पूर्वज राजे होते. अशी शिकवण देऊन अस्पृश्य समाजात स्वाभिमान व आत्मप्रतिष्ठा निर्माण करण्याचा त्यांनी बांधलेला चंग म्हणजे किसन फागूतील द्रष्टा पुरूष होय यात शंका नाही.[१९]

'सन्मार्ग निराश्रित समाजा'ने अस्पृश्य समाजाला उदेद्शून काही आदेश दिले होते ते असे -

१ अज्ञान नाहीसे करा.

२ अस्पृश्यता नष्ट करा.

३ ख्रिस्ती होऊ नका.

४ मृतमांस खाऊ नका.

५ दारु पिऊ नका.

६ शिकून सज्ञानी व्हा.

७ नागरी हक्कासाठी लढा

८ आर्थिक स्थिती उंच करा.

९ हिंदूत अशी भावना निर्माण करा की, त्यांना वाटावे आपण अस्पृश्यांचा स्तर उंचावला पाहिजे.

किसन फागू बंदसोडे यांनी अंतर्गत सुधारणांवर भर दिला होता. त्यांचे हे कार्य विशेष उल्लेखनिय म्हणावे लागेल. त्यावेळी अस्पृश्य जातीतील पोटजाती एकत्र येत नव्हत्या. त्याच्यांत रोटीबेटी व्यवहार होत नसत. याची त्यांना खंत होती. विशेषतः महार जातीतील अंतर्गत तणाव नष्ट करता यावेत यावर त्यांचा अधिक भर होता. त्यासाठी त्यांनी १९१९ साली 'अंत्यज समाज' नावाची संस्था स्थापन करून अंतर्गत दुही नष्ट करण्याचे प्रयत्न केले. पण त्यात त्यांना फारशे यश आले नाही. महारांनी संघटितपणे धार्मिक मिरवणुका काढाव्यात, मृतमांस खाऊ नये, मद्य पिऊ नये, दुसऱ्या धर्माची म्हणजे विशेषतः ख्रिस्ती धर्माची पुस्तके वाचू नये, मुलांना नित्यनेमाणे शाळेला पाठवावे, डुकरे पाळू नये, स्त्रियांनी तमाशा पाहू नये अशा सुधारणा घडवून आणाव्यात म्हणून त्यांनी पराकाष्ठेचे प्रयत्न केले.

पुढे १९०९ साली किसन फागू व गणेश अक्काजी गवई या दोघांनी ब्राम्हो धर्माची (समाजाची) दिक्षा घेतली. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सहीनिशी या समारंभाचे पत्रक काढले होते.

किसन फागूनी अस्पृश्य समाज, हिंदू समाजाची अस्पृश्यांसंबंधीची कर्तव्ये, स्त्री कामगार याबाबत अनेक सभातून परखड विचार मांडले. विठ्ठल रामजी शिंदे यांचा प्रत्यक्ष सहवास त्यांना याच काळात मोठया प्रमाणात लाभला. पण त्यापूर्वीच (इ.स.१९०५ पासून) किसन फागूंच्या कार्याची ओळख व महत्व शिंदयांना पटले होते. ते आपल्या आत्मचरित्रात म्हणतात, "किसन फागू बंदसोडे आणि वऱ्हाड नागपूरकडील इतर अस्पृश्य पुढारी यांनी सोमवंशी हितचिंतक समाज ही संस्थ त्या प्रांती काढली होती. त्यांच्या सूचनेवरुन अहमदनगर येथील अस्पृश्यांचे पुढारी श्रीपतराव थोरात (बटलर),

पांडुरंग लक्ष्मण डांगळे (हेडमास्तर), रावजी सदोबा गायकवाड (शिक्षक न. म्य. शाळा) वगैरेनी ही सभा बोलाविली होती. हया मंडळीचे आत्मसुधारणेच्या कामी पुण्यातील पुढारी शिवराम सदोबा (जानबा) कांबळे यांच्या मदतीने ठिकठिकाणी चारपाच वर्षे प्रयत्न चालले होते. मोहपा (नागपूर) येथील मंडळीकडून आलेले छापील जाहीरपत्रक जमलेल्या सभेस वाचून दाखविण्यासाठी त्यांनी माझ्या हाती दिले. त्यातील उद्देश मला फार बोधप्रद वाटले. हजारो वर्षे वरच्या जातीचा जुलूम सहन करुनही वरिष्ठ वर्गाची मने विनाकारण न दुखविता, किंबहुना कोणत्याही प्रकारे त्यांच्या वाटेस न जाता, अस्पृश्य वर्गानी आपल्या स्वतःच्या हिताचे प्रयत्न करावे, अशा अर्थाचा उद्देश मी नीट सभेला सांगत असता हे उध्दाराचे काम आपग स्वतः अंगावर घेऊन, या कामात स्वतःचे भावी चरित्र वाहून घ्यावे अशी प्रोरणा मला जोराने होऊ लागली.''[२०]

१३ ते १५ एप्रिल १९१३ रोजी नागपूर येथे एक महार परिषद घेण्यात आली होती. या परिषदेतील पत्रकावर किसन फागू, शिवराम जानबा आदी ४५ व्यक्तींच्या सहया होत्या. यानंतरही काही परिषदा झाल्या. या सर्व परिषदांमधून, विविध पोटजाती, स्त्री शिक्षण, मंदिर प्रवेश, निंदय चालीरीती, विटाळ, अज्ञान यावर प्रकाश टाकण्यात आला. पुढे १९२० मध्ये राजर्षि शाहूंच्या अध्यक्षतेखाली माणगाव येथे अस्पृश्यांची परिषद झाली. या परिषदेला डॉ. आंबेडकर उपस्थित होते आणि मे १९२१ मधील बडनेऱ्याची वऱ्हाड महार परिषद यांनी अस्पृशंच्या सामाजिक प्रश्नाबरोबरच राजकीय हक्कांचा खल केला. अस्पृश्यांतील मातंग, चांभार, ढोर याही जातींनी उपरोक्त परिषदात भाग घेतला यावरुन असे अक्षात येते की, अस्पृश्यांची चळवळ आता व्यापक रूप धारण करू लागली होती.''[२१]

## ५. अस्पृश्यांच्या प्रश्नावर लढा उभारणारे शिवराम जानबा कांबळे

## १८७५ ते १ जानेवारी १९४१

शिवराम जानबा कांबळे यांचे वडील,जानबा कांबळे हे आपली भांबुडर्याची वतनदारी सोडून पुण्यास आले आणि युरोपियनांच्या घरी बटलर म्हणून नोकरीस लागले. शिवराम जानबा यांचा जन्म इ.स. १८७५ साली पुणे येथे झाला.

ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या घरच्या वातावरणात शिवरामवर वाचनाचे संस्कार झाले. शिवरामच्या मनात शिकण्याची इच्छा होती. बापाने त्याची शिक्षणाची सोय केली. शिवराम अभ्यास करू लागला, वाचू लागला. वृत्तपत्रातील मजकूर वाचताना तसे लिहिण्याची इच्छा होत होती. महात्मा फुले, बाबा पदमनजी यांच्या सामाजिक लेखनामुळे तो भारावून गेला. त्याचा मनावर परिणाम होत होता. लोकहितवादी, प्रो. जिनसीवाले, गोपाळबाबा इत्यादींच्या लिखाणामुळे शिवराम जानबांना लेखनास प्रवृत केले. कोल्हापूरातून प्रकाशित होणाऱ्या मराठा दिनबंधू या पत्रात शिवराम जानबा यांचे पहिले पत्र दि. १५-१०-१९०२ रोजी प्रकाशित झाले.या पत्रात ते लिहितात -

"जो मनुष्य महार असता, स्पर्शास योग्य मानला जात नाही, इतकेच नव्हे तर ज्याची भटभिक्षुके सावलीही घेत नहीत, तोच मनुष्य ख्रिस्ती झाला म्हणजे स्पर्शास पात्र होतो. आमचे भाटभिक्षुकास असे विचारणे आहे की, आम्हास नीच मानण्याचे कारण कोणते ?" त्यांच्या पत्राचा सूर एकंदरीत ब्राम्हण वर्गाने अस्पृश्यांसाठी काही केलेले नाही पण जागो जागी अन्नछत्रे, देवस्थाने निर्माण करून स्वतःची सोय केली असा आहे. केवळ इंग्रज सरकारने अस्पृश्यांना शिक्षण दिल्याने अस्पृश्य वर्गाला उर्जितावस्था येऊ लागली आहे याची खात्री शिवराम जानबांना वाटत होती."[२२]

हिंदू समाजाची पुनर्घटना व्हावयाची असेल तर उच्च वर्गाने त्यासाठी पुढाकार घ्यावा असे शिवराम जानबांना वाटत होते. पण तसे होणे अशक्य होते. शिवराम जानबांनी वेगवेगळया सुधारणा व्हाव्यात यादृष्टीने प्रयत्न केले. अस्पृश्य मुलांच्या शिक्षणाची विशेष व्यवस्था व्हावी. त्यांना सरकारी नोकऱ्यात, सैन्यात व पोलीसात प्रवेश मिळावा म्हणून जनमत तयार करण्यासाठी शिवराम जानबांनी पुणे जिल्हयात अनेक दौरे केले. दि. २४-११-१९०३ रोजी पुरंदर तालुक्यातील सासवड गावी एकावन्न गावाच्या महारांची सभा भरवून तीत सरकारला आपल्या मागण्या सादर करण्यासाठी अर्ज करण्याचे ठरले. आपल्या मागण्यासाठी सनदशीर मार्गाचा अवलंब करण्यासाठी संघटितपणे केलेला हा अस्पृश्यांच्या इतिहासातील पहिला प्रयत्न होता.[२३]

या अर्जावर १५८८ लोकांच्या सहया मिळवून तो मुंबई सरकारकडे पाठविण्यात आला होता. अर्थात या अर्जाकडे सरकारने फारसे गांभीर्याने पाहिले नाही. पण अस्पृश्य मुलांची सोय मात्र सरकारी शाळातून केली जाईल असे आश्वासन दिले.

५ एप्रिल १९१० रोजी जेजूरीत महार जातीची भव्य परिषद भरवून तीत त्यांनी पुन्हा या प्रश्नाला छेडले. या परिषदेस विठठ्ल रामजी शिंदे उपस्थित होते. आपल्या मागण्यांचा अर्ज थेट विलायतेला पाठविण्याचा निर्णय त्यांनी या परिषदेतच घेतला. शिवराम जानबांनी पार्लमेंट सभेला नोव्हेंबर १९१० मध्ये आपल्या न्याय मागण्यासाठी जो अर्ज सादर केला होता तो अत्यंत महत्वपूर्ण मानला जातो. यातील मसूदा प्राधान्याने लष्करात महारांची भरती, सार्वजनिक सेवेत अस्पृश्यांचा शिरकाव, यावर भर देऊन तयार केला असला तरी, इंग्रज सरकारचे धोरण त्यातील उणीवा आणी पक्षपातीपणा यावरही त्यात जोर देण्यात आला होता.[२४]

अस्पृश्य समाजामध्ये काम करण्यासाठी एखादी संघटना असावी या हेतूने शिवराम जानबा कांबळे यांनी अस्पृश्योन्नतीचे ध्येय डोळयासमोर ठेवून 'श्रीशंकर प्रासादिक सोमवंशीय हितचिंतक मित्र समाज' ही संघटना १ ऑगस्ट १९०४ मध्ये स्थापन केली. त्यावेळी प्रास्ताविकात ते म्हणतात, ''हा समाज स्थापन करण्याचा मूळ हेतू असा आहे की, आपल्यात संघशक्ती नाही, ती उत्पन्न करुन तिच्याद्वारे आपल्या समाजाची अवनत दशा घालवून आपला समाज उन्नतीच्या मार्गावर आणावा. या समाजाने सध्या दोन गोष्टी करण्याचे योजिले आहे. पहिली ही की, या जागेत एक शाळा स्थापन करणार आणि दुसरी ही की, आपल्या लोकाकरीता एक 'श्री सच्चिदानंद वाचनगृह ' स्थापन करण्यात येणार आहे.''[२५] संकल्पाप्रमाणे शाळा आणि वाचनालय अस्तित्वात आले. पणे काही काळातच ही दोन्हीही बंद करावी लागली. पुण्याच्या सबर्बन म्युनिसिपालटीत सरकारचे नियुक्त कौन्सिलर व अस्पृश्यांकरीता चालवलेल्या सरकारी वस्तीगृहाच्या पहाणी कमिटीचे सदस्य म्हणून त्यांनी भरीव कामगिरी केली. शिवाय ते विठठ्ल रामजी शिंदे यांनी स्थापन केलेल्या 'निराश्रीत सहाययकारक मंडळी' या संस्थेच्या पुणे शाखेचे अध्यक्षही होते.

अस्पृश्यांची कैफियत, आपले विचार, भावना मुक्तपणे मांडण्यासाठी शिवराम जानबांनी १९०८ साली 'सोमवंशीय मित्र' नावाचे मासिक पत्र स्थापन करुन समाज जागृतीमध्ये एक महतवाचे पाऊल टाकले.

शिवराम जानबांनी अस्पृश्यांच्या सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक प्रगतीसाठी जसे कार्य केले तसे राजकीय क्षेत्राकडेही लक्ष दिले. 'लोकसंख्येच्या प्रमाणात अस्पृश्यांनाही राजकीय हक्क असावेत, हिंदुस्थानास राजकीय स्वातंत्र्य दयावे असे जर ब्रिटीश सरकारने ठरविले तर अस्पृश्य लोकांना त्यात स्थान असावे आणि कायदे कौन्सिलात

त्यांना लोकनियुक्त प्रतिनिधी म्हणून घेण्यात यावे असे त्यांनी त्यावेळचे माजी गव्हर्नर सिडनेहॅम, डॉ. नायर आणि लंडन टाईम्स यांना इंग्लडांत तारेने कळविले होते.[२६] १९२० नंतर बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व उदयास आले, शिवराम जानबांनी या घटनेचे स्वागतच केले. याच साली नागपूर येथे झालेल्या पहिल्या बहिष्कृत सभेतही छ. शाहूनी बाबसाहेबांच्या नव्या नेतृत्वाचे सूतोवाच केले होते. नागपूरच्या सभेत बाबासाहेब आणि शिवराम जानबाही होते. शिवराम जानबानी या सभेत भाषणही केले होते. याच सभेत डॉ. मॅन बरोबरच बाबासाहेबांचाही सत्कार करण्यात आला होता.[२७]

पुढे १९२६ साली मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये अस्पृश्यांचा प्रतिनिधी असावा असा आग्रह तर त्यांनी धरलाच पण अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना घेण्यात यावे असे सरकारला कळविले. पुण्याच्या पर्वतीच्या सत्याग्रहात (१९२९) त्यांनी सक्रिय भाग घेतला आणि या सत्याग्रहाचे नेतृत्वही त्यांनी केले. १९३० साली नागपूर येथे भरविण्यात येणाऱ्या ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस कॉंग्रेसचे कार्यवाह श्री. एल.एन.हरदास यांच्या पत्राला उत्तर देताना शिवराम जानबांनी लिहिले होते,

> 'With regard to the Presidentship of the proposed Congress, I suggest the name of Dr. Ambedkar and also that he should be sent to London as the representative of Depressed Classes for the Round Table Conference.'[२८]

यावरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरासारख्या विद्वान माणसाचे नेतृत्व शिवराम जानबांना मान्य होते. तसेच त्यांना आदरही वाटत होता असे दिसते.

गोपाळबाबा वलंगकर, किसन फागू बंदसोडे, शिवराम जानबा कांबळे आणि अनेक अज्ञात अस्पृश्य कार्यकर्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाचा उदय

होण्यापूर्वी अस्पृश्य चळवळीला प्रारंभ केला होता. त्यांच्याजवळ फारशी साधने नव्हती. काही वैयक्तिक मर्यादाही होत्या. तरीही या महान कार्यकर्त्यांनी जीवाचे रान करुन समाजजागरणाची कास धरली, याला दलितांच्या मुक्तीसंग्रामात फार मोलाचे स्थान आहे.

## ६. अस्पृश्यांचा प्रश्न काँग्रेसच्या व्यासपीठावर नेणारे सुधारक विठ्ठल रामजी शिंदे

विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म २३ एप्रिल १८७३ रोजी जमखंडी येथे झाला. जमखंडी, पुणे, इंग्लंड इ. ठिकाणी त्यांचे शिक्षण झाले. शिक्षण घेऊन परत आल्यानंतर त्यांनी साहेबी संसार न थाटता प्रार्थना समाजाचे आचार्य बनले. पुढे त्यांनी स्वतःला समाजसुधारणेस वाहून घेतले.

महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर (२७ नोव्हेंबर १८९०) अस्पृश्यांच्या प्रश्नावर व्यापक अशा प्रमाणात विचार आणि कार्य करणारा बहुजन समाजातील सुधारक म्हणजे विठ्ठल रामजी शिंदे होत. अस्पृश्य समाजात जागृती करणे, त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करुन देणे आणि त्यांच्यात प्रगती करणे यादृष्टीने महर्षि शिंदे यांनी कार्य केले. कर्मवीर शिंदे यांनी १९०३-१९०४ साली अस्पृश्यांच्या प्रश्नाचा विचार करण्यास सुरुवात केली. १९०६ साली अस्पृश्यांसाठी स्वतंत्र 'भारतीय निराश्रीत सहाय्यकारी मंडळ' ही संस्था स्थापन केली. ते स्वतः अस्पृश्यांच्या वस्तीतच आपल्या मुलाबाळांसह, बायकोसह जाऊन राहिले व सर्व आयुष्य याच कार्याला समर्पित केले.[२९]

निराश्रीत सहाय्यकारी मंडळाच्यावतीने त्यांनी अनेक शाळा अस्पृश्यांसाठी सुरु केल्या. या संस्थेने शाळाबरोबर दवाखाने काढले, वसतीगृहे काढली, प्रवचने व व्याख्याने यांची झोड उठविली. संस्थेचा व्याप वाढता वाढता १९१२ सालापर्यंत चौदा

ठिकाणी २३ शाळा अस्पृश्यांसाठी सुरु होऊन त्यातून ५५ शिक्षक शिकवू लागले व ११०० मुले त्यांच्या हाताखाली शिकू लागली.[३०]

'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' या नावाची पुस्तिका लिहून अस्पृश्यतेच्या संदर्भातील आपले विचार संशोधन त्यांनी यामध्ये मांडले असून या पुस्तकाच्या रुपाने त्यांनी अस्पृश्यतेचा प्रश्न वेशीवर टांगण्याचा प्रयत्न केला. नुसते प्रश्न मांडून ते थांबले नाहीत तर अस्पृश्यांच्या वस्तीत राहूनत्यांनी त्यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यतेचा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर महर्षि शिंदे यांनीच नेला असे म्हटले तर फारसे वावगे ठरणार नाही. १९१७ साली कलकत्ता येथे काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन होते. डॉ. ॲनी बेझंट यावर्षी अधिवेशनाच्या अध्यक्षा होत्या. त्यांच्यामार्फत कर्मवीर शिंदे यांनी भारतीय अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी काँग्रेसने प्रयत्न केला पाहिजे असा ठराव पास करुन घेतला. त्यापूर्वी ८-१० वर्षे कर्मवीर शिंदे यांनी असा ठराव काँग्रेस अधिवेशनात काँग्रेसच्या व्यासपीठावरुन पास करुन घेण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला. १९१७ साली मात्र त्यांचे दहा वर्षाचे परिश्रम फलदायी ठरले. राष्ट्रीय काँग्रेस या ठरावामुळे राजकीय सुधारणेबरोबर सामाजिक सुधारणेलादेखील बांधली गेली.[३१] १९२० साली तर महात्मा गांधीनी नागपूरच्या अधिवेशनात विठठ्ल रामजीना काँग्रेस वर्कींग कमिटीमध्ये घेऊन अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यालया निःसंदिग्ध पाठींबा दिला.

सामाजिक आणि राजकीय पातळीवर अस्पृश्यता निर्मूलनाच्याकार्यास सर्वांचा पाठींबा मिळविण्यात विठठ्ल रामजी यांना मोठे यश आले होते. दलित समाजाच्या उध्दारासाठी जुनाट रूढी, चालीरीती आणि बुरसटलेले विचार यांच्याविरूध्द त्यांनी आपल्या उभ्या आयुष्यात फार मोठा लढा उभारला होता. वेगवेगळया अंगाने अस्पृश्योध्दाराचे असे संघटित प्रयत्न अखिल भारतीय पातळीवर कोणी केले नव्हते. अस्पृश्यतेचा प्रश्न अखिल भारतीय पातळीवरुन सोडविण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

महात्मा जोतिबा फुले, विठ्ठल रामजी शिंदे यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन कोल्हापूर संस्थानात छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्यांसाठी भरीव स्वरुपाचे कार्य केले. त्यांच्या सर्व कार्यामुळे त्यांना लोकांचा राजा ही पदवी प्राप्त झाली होती. त्यांनी आपल्या राजसत्तेचा उपयोग दलित, भटके, आदिवासी यांच्या विकासासाठी केला. त्यांना समाजात चांगल्या पध्दतीने राहता यावे, त्यांच्यातील अनिष्ठ प्रथा बंद व्हाव्यात यासाठी स्वतः युक्तीने व कृतीने प्रयत्न केले. त्यांनी अनेक पुरोगामी स्वरुपाचे कायदे आपल्या संस्थानात करुन त्या कायदयांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली. १९१८ साली संस्थनातील वतनदारी नाहीशी करण्याचा कायदात्यांनी केला. महार वतनदारी नष्ट करुन, वतनदार व गाव कामगार महार यांना गावकीच्या व रोजच्या गुलामी कामातून मुक्त केले. त्यांच्याकडून सक्तीने काम करुन घेण्यास बंदी करण्यात आली. तशा प्रकारचे २५ जून १९१८ रोजी त्यांनी फर्मान काढले. ३ मार्च १९१९ च्या नव्या हुकुमाने बलुतेदार पध्दतीला आळा घातला. अस्पृश्यांची वेठबिगारी कायदयाने बंद केली. सार्वजनिक विहिरी, तळी, पाण्याचे नळ,धर्मशाळा, दवाखाने, शाळा व कचेऱ्या या ठिकाणी अस्पृश्य वर्गाला वावरण्याचे व उपभोग घेण्याचे समान हक्क दिले.[३२]

या हक्काबरोबरच अस्पृश्यांच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी १९०८ साली '' मिस क्लार्क'' नावाचे वसतीगृह सुरु केले. अस्पृश्यांना निरनिराळया प्रकारच्या नोकऱ्या दिल्या. पट्टेवाले, शिपाई, डगलेवाले, माहूत, कोचमन, ड्रायव्हर इत्यादी नोकऱ्या देऊन महाराजांनी त्यांना आपल्या संस्थानात नेमले. एवढेच नव्हे तर त्यांनी आपल्या संस्थानात अस्पृश्यांसाठी ५० टक्के राखीव जागा ठेवल्या होत्या. (१९०२) त्याकाळी शाहू महाराजांना प्रचंड विरोध सहन करावा लागला. परंतु शाहु महाराज यासंदर्भात म्हणतात की, ''दलितांच्या सेवेसाठी मला छत्रपतीचे सिंहासन सोडावे लागले तरी पर्वा नाही''[३३] त्यांच्या या उद्‌गारावरुन त्यांना अस्पृश्यांबद्दल किती तळमळ होती हे आपणाससमजेल.

महाराजांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी आपल्या संस्थानात अनेक अभिनव प्रयोग केले. गंगाराम कांबळे या अस्पृश्य व्यक्तीला त्यांनी सर्वप्रथम हॉटेल काढण्यासाठी सहाय्य करुन ते स्वतः त्या हॉटेलात दररोज जाऊन चहा घेऊ लागले. त्यांची ही कृती अस्पृश्यता नाहीशी होण्यास सहाययभूत ठरली. याशिवाय अस्पृश्यांना सोडा वॉटरचे दुकान, शिलाईचे दुकान, यासाठी आर्थिक सहकार्य केले.

शिक्षणाशिवाय अस्पृश्यांची प्रगती होणार नाही हे ओळखून, अस्पृश्यांनां शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न व कायदे केले. अशा प्रकारची अनेक कार्ये करुन पद-दलितांचा उध्दार करीत असतानाच शाहू महाराजांच्या प्रेरणेने अनेक अस्पृश्यांतील सुधारक पुढे आले. गंगाराम कांबळे, पंजाबराव हुलस्वार, दा.म.शिर्के, गंगाधर यशवंत पोळ, गंगाराम यमाजी कांबळे, प्रभू यल्लाप्पा कांबळे, आबा सुबू गवळी, डी.एस.पवार, गणेशाचार्य वकिल इ. नेते अस्पृश्यांसाठी कार्य करु लागले. महाराजांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे व पाठींब्यामुळे दत्तोबा पवार यासारखे कार्यकर्ते अस्पृश्य समाजामध्ये निर्माण झाले. त्यांनी दत्तोबाची कोल्हापूर नगरपालिकेच्या स्थायी समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक केली. ते त्या जागेवर १९२० ते १९२५ पर्यंत कार्य करीत होते. ते पुढे कर्तबगारीने मामलेदार व कॉंग्रेसचे आमदार झाले. अध्यक्षपदावरील ही नेमणूकीची घटना कोल्हापूर संस्थानात त्याकाळी क्रांतीकारक ठरली.[३४]

असे अनेक क्रांतीकारक प्रयोग शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीत केलेले दिसतात. डॉ. आंबेडकरांचा उदय व त्यांच्या सार्वजनिक क्षेत्रातील कार्यालादेखील शाहू महाराजांनी उदार अंतःकरणाने मदत केली होती. एवढेच नव्हे तर माणगावच्या परिषदेत त्यांनी डॉ. आंबेडकरांचा अस्पृश्यांना नेता मिळाला म्हणून गौरवोद्‌गार काढले होते.

नागपूर, बेळगाव, दिल्ली अशा ठिकाणच्या अस्पृश्यांच्या परिषदांना ते आवर्जून उपस्थित राहिले होते. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात अस्पृश्यांचा विकास करीत असताना अनेकांच्या टिका, धमक्या आल्या. पण त्यांनी त्यास भीक घातली नाही. उलट तेवढयाच जोमाने आणि धीरगंभीरतेने अस्पृश्यांच्या विकासाचे व अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य त्यांनी अखंड आयुष्यभर केले.

अशा प्रकारे आंबेडकर पूर्वकाळात वेगवेगळया सुधारकांनी अस्पृश्यांच्या विकासासाठी व अस्पृश्यता निर्मूलनासाठी कार्य केल्याचे दिसून येते. आंबेडकरपूर्व दलितांची चळवळ त्यांच्या विचारांवर व कार्यावर उभी राहिल्याचे आपणास पहावयाचे मिळते.

## समारोप

आंबेडकर काळात जशी अस्पृश्यांची/दलितांची चळवळ उभी राहिली तशी ती आंबेडकरपूर्वकाळात उभी राहिली नसली तरी त्यादृष्टीने काही लोकांचे प्रयत्न चालू होते.

चातुर्वर्ण्यव्यवस्थेनंतर अस्पृश्यता, जातीभेद निर्माण झाले. चार्तुवर्ण्यव्यवस्थेत विषमता भरलेली होती. तीच व्यवस्था दीर्घकाल चालत राहिली, चालत आहे. या व्यवस्थेमुळे काही लोकांचे प्रचंड प्रमाणात शोषण झाले तर काहींनी इतरांचे शोषण करण्यासाठी स्वतःचे हितसंबंध जपण्यासाठी या व्यवस्थेचे समर्थन केले. या विषमताप्रधान व्यवस्थेला धर्माचा मुलामा दिला.

महात्मा फुले यांनी प्रथम या शोषणाविरुध्द, विषमतेविरुध्द आवाज उठवला, बंड पुकारले. शुद्रातिशूद्र बहुजनांना एकत्र करुन त्यांना त्यांचे माणूसपणाचे हक्क आणि अधिकार मिळवून देण्यासाठी संघर्ष पुकारला. शिक्षणातून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण

केला. पुढे विठ्ठल रामजी शिंदे यांनी निराश्रीत सहाययकारी मंडळी व कॉंग्रेसच्या माध्यमातून अस्पृश्यांसाठी कार्य केले. अस्पृश्यांतीलच गोपाळबाबा, किसन फागू बंदसोडे, शिवराम जानबा कांबळे इ. सुधारकांनी वृत्तपत्रे, सभा इ.द्वारे समाज जागृत केला. सुधारणा,शिक्षणशाळा, वर्तमानपत्रे,मासिके इ. द्वारे त्यांच्या जागृती व सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. शाहू महाराजांनी अस्पृश्योध्दारासाठी व अस्पृश्यता निवारण्यासाठी अनेक प्रकारचे कायदे, फर्मान काढून अस्पृश्यांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. महात्मा गांधीनीही अस्पृश्यता निवारणास महत्व देऊन हरिजन सेवक संघाची स्थापना केली. यायोगे दलितांत सुधारणा व अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

वरील सर्व सुधारकांनी त्यात्या काळी आपआपल्यापरिने अस्पृश्यांमध्ये, शिक्षण, सुधारणा, जागृती व संघटन केले आणि भविष्यकालीन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या क्रांतीकारक समाज सुधारकासाठी त्यांच्या चळवळीसाठी पार्श्वभूमी तयार केली.

# टिपा


१. खैरमोडे चांगदेव - 'डॉ.आंबेडकर यांच्या चळवळीची पार्श्वभूमी', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७६, पृ.क्र.८

२. खरात शंकरराव - 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर', ठोकळ प्रकाशन, पुणे, १९६६, पृ.२

३. उक्त पृ. २

४. प्रा. पाटगावकर चंद्रकांत - 'दैनिक पुढारी' २४ डिसेंबर, १९८८, पृ. ५

५. भिडे जी.एल. व पाटील एन.डी. - 'महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास' फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८८, पृ.क्र. २८

६. प्रा. डोळस अविनाश - 'आंबेडकरी चळवळ : परिवर्तनाचे संदर्भ' , सुगावा प्रकाशन, पुणे १९९५, पृ. ४२

७. उक्त पृ. ४२

८. भिडे जी.एल. व पाटील एन.डी. - उपरोक्त पृ.क्र. ७८

९. कुलकणी दत्ता - 'म.फुले समाजक्रांतीचा अग्रदूत' रघूवंशी प्रकाशन, पुणे, १९७८, पृ.क्र. ७९

१०. भिडे जी.एल. व पाटील एन.डी. - उपरोक्त पृ.क्र. ७९

११. प्रा. डोळस अविनाश - उपरोक्त पृ. ४३

१२. जोतिराव फुले समग्र ग्रंथ - अधिकारी प्रकाशन, मुंबई , १९९१, पृ. क्र. ७

१३. डॉ. पानतावणे गंगाधर - 'पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर', अभिजित प्रकाशन, नागपूर, १९८७, पृ.क्र. १६

१४. उक्त पृ. १६

१५. उक्त पृ. १७

१६. उक्त पृ. १७

१७. शिंदे वि.रा. - 'माझ्या आठवणी व अनुभव', श्री लेखन वाचन भांडार, पुणे १९५८, पृ. २१४

१८. डॉ. पानतावणे गंगाधर - दलितांचे प्रबोधन, विचार ग्रंथमाला प्रकाशन, औरंगाबाद, ६ डिसेंबर, १९७८, पृ. १८

१९. उक्त पृ. २०

२०. शिंदे वि.रा. - 'माझ्या आठवणी व अनुभव', श्री लेखन वाचन भांडार, पुणे, १९५८, पृ. २१५-२१६.

२१. उक्त पृ. २७

२२. उक्त पृ. ३०

२३. उक्त पृ. ३१

२४. उक्त पृ. ३३

२५. 'नवलकर ह.ना. - शिवराम जानबा कांबळे चरित्र पृ. १९

२६. डॉ. पानतावणे गंगाधर - उपरोक्त पृ. ३९

२७. उक्त पृ. ४०

२८. नवलकर ह.ना. - शिवराम जानबा कांबळे, पृ.क्र. १७५

२९. डॉ. मंगुडकर मा.पा. - 'कर्मवीर शिंदे यांचे जीवन व कार्य, सुवर्णा मंगुडकर प्रकाशन, पुणे , १९७६, पृ. २५

३०. द. रा. बगाडे, पददलितांचे कैवारी - म. शिंदे जन्मशताब्दी स्मृतीग्रंथ, संपादक डॉ.एस.एस.भोसले व शिवाजीराव सावंत, प्रकाशक बाळासाहेब माने, अध्यक्ष, जि.प.,कोल्हापूर, १९७४, पृ. ११८

३१. डॉ. मंगुडकर मा.पा. - उपरोक्त पृ. २५

३२. खरात शंकरराव - 'अस्पृश्यांचा मुक्तीसंग्राम' मेसर्स जोशी व लोखंडे प्रकाशन, पुणे, १९७०, पृ.क्र. १२

३३ डॉ. सूर्यवंशी गणपतराव - 'राजा शाहू आणि समाज प्रबोधन, रणजित प्रकाशन, इचलकरंजी, १९७८, पृ.क्र: ६२

३४. उक्त पृ. ७७